महाराष्ट्र शासन
आयुक्त
आज़ादी का अमृत महोत्सव
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष,
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

DMER-11011/31/2022-CETIT दिनांक : 14/10/2024

प्रति,

अधिष्ठाता,

१. सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, महाराष्ट्र राज्य

२. सर्व बृहमुंबई महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य

विषय : सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील बी.एस्सी. इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (बीपीएमटी) अभ्यासक्रमाचे प्रवेश संस्थास्तरावर करणेबाबत...

संदर्भ : शासन पत्र क्रमांक एमईडी १०१४/प्र.क्र. ३२४/१४/ शिक्षण-२ दिनांक १६ ऑक्टोंबर, २०१४.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षीकरिता बी.एस्सी. इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (बी.पी.एम.टी.) या अभ्यासक्रमाचे प्रवेश इयत्ता १२ वी विज्ञान शाखा (एच.एस.सी.) परीक्षा उत्तीर्ण ही पात्रता ठेवून संस्थास्तरावर प्रवेश प्रक्रिया राबविण्याची परवानगी या सुचना पत्राद्वारे देण्यात येत आहे.

बी.एस्सी. इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (बी.पी.एम.टी.) च्या प्रवेशाकरिता आवश्यक असणारी पात्रता-

१. उमेदवारांकडे भारताचे नागरिकत्व असणे आवश्यक आहे.
२. उमेदवारांचा जन्म दिनांक ३१ डिसेंबर, २००७ पुर्वी झालेला असावा.
३. उमेदवाराने १० वी आणि १२ वी इयत्ता महाराष्ट्र राज्यातील संस्थामधून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
४. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.
५. उमेदवार इयत्ता १२ वी (विज्ञान शाखा) ही भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयातून उत्तीर्ण झालेला असावा.
६. उमेदवार १२ वी विज्ञान परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांऐवजी इतर विषयात विज्ञान शाखा उत्तीर्ण झालेले असल्यास उदा. Medical Lab Technician-१, Medical Lab Technician-२, Medical Lab Technician-३ हे विषय घेवून उत्तीर्ण झाला असल्यास त्याला त्याच्या विषयांसंबधी बी.एस्सी. इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (बीपीएमटी) अभ्यासक्रमास पात्र ठरवावे.

७. उमेदवार १२ वी विज्ञान परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांऐवजी इतर विषयात विज्ञान शाखा उत्तीर्ण झालेले असल्यास उदा. Radiology Technician-१, Radiology Technician-२, Radiology Technician-३ हे विषय घेवून उत्तीर्ण झाला असल्यास त्याला त्याच्या विषयांसंबधी बी.एस्सी. इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (बीपीएमटी)- रेडीओग्राफी टेक्नॉग्राफी अभ्यासक्रमास पात्र ठरवावे.

बी.एस्सी. इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (बीपीएमटी) अभ्यासक्रमाचे प्रवेश संस्थास्तरावर करण्याकरिता प्रत्येक संस्थेमार्फत प्रवेश प्रक्रियेबाबतची स्वंतत्र अधिसूचना (वेळापत्रक, प्रवेश शुल्क इत्यादी) प्रसिध्द करण्यात यावी. अधिसूचना प्रसिध्दी करण्याकरिता येणारा खर्च संस्थेच्या मंजूर अनुदानातुन खर्ची करण्यात यावा. प्रत्येक संस्थेतील बी.एस्सी. इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (बीपीएमटी) अभ्यासक्राचा विषय निहाय आणि संवर्गनिहाय तक्ता संस्थास्तरावर समिती गठीत करून तयार करण्यात यावा व त्याप्रमाणे गुणवत्तेनुसार प्रवेश प्रक्रिया राबवावी. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी दिलेल्या विषयनिहाय प्रवेश क्षमतेनुसार प्रवेश करण्यात यावे तसेच त्यामध्ये संस्थास्तरावर कोणतेही बदल करण्यात येवू नयेत. संस्थास्तरावर अशा प्रकारचे बदल केल्यास तर त्यास संचालनालयाकडून मान्यता देण्यात येणार नाही.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता बी.एस्सी. इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (बीपीएमटी) अभ्यासक्रमाची प्रवेशाची अंतिम दिनांक ३१ नोव्हेंबर, २०२४ अशी राहील. त्यानुसार योग्य कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Rajeev Dattatray Nivatkar
Date: 14-10-2024 15:06:42
आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण,संशोधन व आयुष

प्रत,

कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरूळ, दिंडोरी रोड, नाशिक-४२२००४ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.